| | | |
|---|---|---|
| MHKO050002642021 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ०९/२०२१ मधील नि.१७ खालील आदेश** | **राणी शिवाजी कांबळे वि. शिवाजी तातोबा कांबळे** |

१. अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज त्यांची मुलगी कु.श्रेया हिचा ताबा मिळणेकरीता मागणी केली आहे. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदारने असे कथन केले आहे की, त्यांना दोन अपत्य आहेत. त्यापैकी वि.प.नं.१ पासून दि.१४/११/२००८ रोजी श्रेया नावाची मुलगी झाली. श्रेया ही वि.प. यांच्याकडे असून वि.प. हे श्रेयाशी अर्जदार यांना संपर्क करु देत नाही. त्यामुळे अर्जदार यांना पुत्री प्रेमापासून वंचीत रहावे लागत आहेत. वि.प. हे अर्जदार यांना मानसिक त्रास देणेच्या दृष्ट हेतूने सदरचे गैरकृत्य करत आहेत. श्रेया ही दहावी मध्ये शिक्षण घेत आहे. अर्जदार ह्या उच्चशिक्षीत असल्यामुळे श्रेयाचा ताबा मिळालेस तिला योग्य रितीने दहावीच्या शिक्षणामध्ये मदत करु शकतील. अर्जदार पुढे असे कथन करतात की, मुलगी श्रेयाचा ताबा शाळेच्या सुट्टीच्या दिवशी म्हणजे शनिवारी व रविवारी तसेच शाळेच्या उन्हाळी, दिवाळी व हिवाळी सुट्टीमध्ये मिळण्याची विनंती केली आहे.

२. वि.प.यांनी प्रस्तुत अर्जास नि.१८ कडे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील मजकूर हा अभिलाष बुध्दीचा, खोटा व लबाडीचा असून वि.प. यांना मान्य व कबूल नाही. तसेच वि.प. यांनी सदरच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. अर्जदार यांनी प्रस्तुतचा म.सं.कौ.हिं.का.अर्ज हा दि.११/०१/२०२१ रोजी दाखल केला आहे. तथापि प्रस्तुतचा मुलगीचा ताबा मिळणेकरीताचा अर्ज हा दि.२५/०५/२०२३ रोजी दाखल केला आहे. त्यामुळे मुलः अर्जदार यांचा अर्ज चालणेस पात्र नाही. वास्तविक

अर्जदार यांनीच वि.प. चा व कु.श्रेया हिचा त्याग केलेला आहे. वि.प. यांनी कें‍व्हाही अर्जदार व कु.श्रेया यांचे दरम्यान दुरावा निर्माण करणेचा प्रयत्न केलेला नाही. परंतु अर्जदार हयाच आजतागायत कें‍व्हाही मुलगी श्रेया हिस भेटणेस आलेल्या नाही. तसेच वि.प. यांनी अर्जदार यांना मुलगी श्रेयास भेटणेस कधीही मज्ञाव केलेला नाही. कु.श्रेया ही इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असलेने तिच्या अभ्यासामध्ये व्यत्यय कोणीही आणू नये अशी वि.प. यांची इच्छा आहे. तसे झालेस कु.श्रेया हिचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करणेची विनंती वि.प. यांनी केली आहे.

**३.** अर्ज व म्हणणे वाचले. दोनही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. मुलगी श्रेयाला हजर करण्याकरीता दि.०९/०६/२०२३ रोजी आदेश पारीत करण्यात आला होता. त्या आदेशाप्रमाणे आज रोजी माझ्या समक्ष मुलगी श्रेया ही हजर झाली. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, श्रेयाचा ताबा हा अर्जदार हिला देण्यात यावा. या उलट गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, मुलगी श्रेया ही १० वी इयत्तेत शिकत आहे, ती अर्जदार हिच्याकडे जाण्यास तयार नाही. जर का मुलगी श्रेया हिला अर्जदार यांच्यासोबत शाळेच्या सुट्टीच्या दिवशी म्हणजेच शनिवार व रविवार या दिवशी आणि उन्हाळी, दिवाळी व हिवाळी सुट्टीमध्ये ताबा दिला तर मुलगी श्रेयाचा १० वी इयत्तेच्या शिक्षणिक वर्षात बाधा निर्माण होतो. त्यामुळे श्रेया हिचे म्हणणे ऐकणे आवश्यक होते. म्हणून मी श्रेयाला न्यायालयासमक्ष हजर करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे श्रेया आज रोजी न्यायालयात हजर झाली.

**४.** श्रेयाला न्यायालयासमक्ष प्रश्न विचारण्यात आले. त्यावेळी श्रेयाने सांगितले की ती अर्जदार हिच्याकडे जावू शकत नाही, कारण तिला ६ वर्षापासून अर्जदार हि भेटलेली नाही, किंवा अर्जदार ही तिच्याकडे आली नाही. श्रेयाने न्यायालयासमक्ष असे ही सांगितले की, अर्जदार हिला आजच मातृत्वाची आठवण येत आहे. अर्जदार ही गेल्या सहा वषापासून तिच्याबाबत काहीही चौकशी करत नव्हती. तसेच श्रेयाने असे ही सांगितले की अर्जदार हीला तिच्या शाळेमध्ये येण्याकरीता पाबंध करण्यात यावे. आज रोजी श्रेया ही दहावीच्या वर्गामध्ये शिक्षण घेत आहे. श्रेयाला विचारण्यात आलेलया प्रश्नांची उत्तरे श्रेया हिने समजून दिलेली आहेत. श्रेयाने निसंकोचपणे व ठामपणे न्यायालयासमक्ष सांगितले की, तिचा ताबा अर्जदार हिचेकडे देण्यास चिा विरोध आहे. श्रेयाच्या वयाचा विचार केला तर तिला बरे किंवा वाईट हे चांगल्याप्रकारे समजू शकते. श्रेयाने न्यायालयासमक्ष निसंकोचपणे व ठामपणे दिलेल्या उत्तरांचा विचार केला तर असे स्पष्टपणे दिसून येते की श्रेयाचा ताबा जर अर्जदार हिचे कडे दिला तर नक्कीच श्रेयाच्या इयत्ता दहावीच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणून श्रेयाच्या शिक्षणाचा विचार करता यावेळी श्रेयाचा ताबा अर्जदार यांचेकडे देणे योग्य होणार नाही. जर श्रेयाचा ताबा अर्जदार यांचेकडे दिला तर नक्कीच श्रयाच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होवू शकतो.

**५.** ही बाब मान्य व कबूल आहे की, श्रेया ही वि.प. यांच्याकडे असून ती चांगल्या शाळेमध्ये शिक्षण घेत आहे. अर्जदार यांचे असे म्हणणे नाही की तिने श्रेया हिला भेटण्याचा प्रयत्न केला. फक्त वि.प. हे श्रेयाशी संपर्क करुन देत नाहीत असे कथन केले आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिने नोव्हेंबर २०१८ रोजी तिच्या मुलासह वि.प. यांचे घर

सोडले आहे. यावरुन ही बाब स्पष्ट होते की श्रेया ही नोव्हेंबर २०१८ पासून वि.प. यांचेकडे आहे. नोव्हेंबर २०१८ पासून ते आजपर्यंत अर्जदार हिने श्रेयाला भेटण्याकरीता व संपर्क करण्याकरीता काय प्रयत्न केले याबाबत अर्जदार काहीही सांगत नाही. त्यामुळे वि.प. हे श्रेयाला भेटू देत नाहीत किंवा संपर्क करु देत नाहीत या अर्जदाराच्या विधानावर साक्षीपुरावा घेतल्याशिवाय विश्वास ठेवता येणार नाही. याशिवाय कायद्याच्या तत्वाप्रमाणे वडील हे मुलांचे नैसर्गीक पालन कर्ता असतो.

**६.** प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांचे विधीज्ञांनी *मा. मुंबई उच्च न्यायालय अपीलीय न्यायालयातील फौजदारी अर्ज क्र.१८६/२०१८– सौ. पायल सुदीप लाड उर्फ पायल शर्मा विरुध्द सुदीप गोविंद लाड* यांचा न्यायनिर्णय हजर केला आहे. सदर न्यायानिर्णयाचे अवलोकन केले असता सदर न्यायनिर्णयातील परिस्थिती व पार्श्वभूमी ही प्रस्तुत खटल्यातील परिस्थिती व पार्श्वभूमीपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे सदरचा न्यायनिर्णय अर्जदार यांना सहाय्यक नाही. दोनही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर व मुलगी श्रेया हिचे म्हणणे जबाब ऐकल्यानंतर मी असे नमुद करतो की, यावेळी श्रेयाचा ताबा जर अर्जदार हिचेकडे दिलातर नक्कीचा श्रेयाच्या दहावीच्या अभ्यासावर परिणाम होवू शकतो म्हणून मुलगी श्रेया हिचा ताबा अर्जदार हिचे कडे देणे योग्य होणार नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2023.06.13 18:45:50 +0530

**दिनांक-१३/०६/२०२३**
**इचलकरंजी.**

**(संजय दि.वानखेडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**